# सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळांतील उच्च श्रेणी मुख्याध्यापकांच्या प्रशासकिय व शैक्षणिक कामकाजात येणाऱ्या अडचणींचा शोध

**डॉ. अंकुश तुळशीराम औंधकर,**
**प्राचार्य,**
**व्ही.वाय.एस.अध्यापक महाविद्यालय,**
**तोंडवली ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग.**
**व**
**श्री. रामचंद्र आंगणे,**
**शिक्षण विस्तार अधिकारी,**
**ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग.**

शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. शिक्षणामुळेच माणसाची आजपर्यंत प्रगती झालेली दिसून येते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वांतंत्र्य मिळाल्यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी स्वातंत्र्य भारताचे संविधान अंमलात आले. खरंतर त्या दिवसापासून ६ ते १८ वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे होणे आवश्यक होते. भारतीय राज्य घटनेच्या कलम ४५ मध्ये स्पष्ट नमूद करण्यात आले होते कि,

The State shall endeavour our to provide, within a period of ten years from the commencement of This Constitution. For Free and compulsory education For all children until they complete the age of Fourteen years.

ग्रामीण भागातील प्रत्येक मुलाला शिक्षणाचा हक्क प्राप्त होण्यासाठी २००९ साल उजाडले. ग्रामीण भागातील मुलांना प्राथमिक शिक्षण मिळावे म्हणून शासनाने स्थानिक स्वराज्य माध्यमातून गावागावात, वाडीवस्तीवर शाळा सुरु करण्याचा प्रयत्न केला. या शाळांचा कारभार चालविण्यासाठी सुरुवातीच्या काळात उपलब्ध शिक्षकातील जेष्ठ शिक्षकाकडे जबाबदारी सोपवली जात असे. मात्र

महाराष्ट्र राज्यामध्ये २२ ऑक्टोबर १९७० च्या शासन निर्णयाद्वारे उच्च श्रेणी मुख्याध्यापक पद निर्माण करण्यात आले.

शालेय कामकाज चालविण्यामध्ये शाळेचा मुख्याध्यापक हा प्रमुख घटक असतो. शालेय शैक्षणिक व प्रशासकिय कामे करताना त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. विविध शासकिय योजनांची अंमलबजावणी करताना शैक्षणिक कर्तव्याकडे दुर्लक्ष होते. अपुरा शिक्षक वर्ग ग्रामीण भाग, गरीब व अशिक्षित घरातून येणारे विद्यार्थी बोली भाषा, काही पालकांची शिक्षणाबदलची अनास्था राजकिय दबाव इत्यादी अनेक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते. अशा समस्यांचा अभ्यास होणे अगत्याचे आहे.

**.गरज व महत्व -**

जसा मुख्याध्यापक तशी शाळा असे म्हटले जाते. अध्यापक, प्रशासक व व्यवस्थापक अशा विविध भूमिकातून मुख्याध्यापकाला कामकाज करावे लागते. मुख्याध्यापक अध्यापन कुशल असेल तर तो आपल्या सहकारी शिक्षकांना दर्जेदार अध्यापन करण्यास मार्गदर्शन करतो. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीवर होतो. शालेय शिस्त राखणे आणि शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी विविध उपक्रमांची कार्यवाही करणे हे त्यांचे कर्तव्य असते. त्यांच्या दैनंदिन कामकाजातून व वर्तमानातून शाळेचा दर्जा प्रतिबिंबित होत असतो.

EIIRJ Bi -monthly Journal

संशोधकाला शाळा भेटीच्या वेळी मुख्याध्यापकांना अनेक समस्या येतात हे लक्षात आले. मुख्याध्यापकांना त्यांच्या प्रशासकिय व शैक्षणिक कामकाजात येणाऱ्या अडचणींचा शोध घेऊन त्यांना मार्गदर्शन करता असे म्हणून हे संशोधन हाती घेतले.

**समस्या विधान -**

पूर्ण प्राथमिक शाळातील उच्च श्रेणी मुख्याध्यापकांच्या प्रशासकिय व शैक्षणिक कामकाजात येणाऱ्या अडचणींचा शोध.

**कार्यात्मक व्याख्या -**

१) पूर्ण प्राथ शाळा - इ. १ ली ते ७ वी पर्यंत वर्ग असलेली तसेच पदवीधर शिक्षक व उच्च श्रेणी मुख्याध्यापक असलेली जिल्हा परिषद शाळा.

२) उच्च श्रेणी मुख्याध्यापक - जिल्हा परिषदच्या पूर्ण प्राथमिक शाळेत मंजूर असलेले शासनमान्य पद. पूर्ण प्राथमिक शाळेचे नियंत्रण करणारी व्यक्ति

३) प्रशासकिय समस्या - उच्च श्रेणी मुख्याध्यापकाला शालेय प्रशासकिय कामकाज करीत असताना येणाऱ्या अडचणी.

४) शैक्षणिक समस्या - उच्च श्रेणी मुख्याध्यापकाला शालेय शैक्षणिक कामकाज करताना येणाऱ्या अडचणी.

- **चले -**

१) प्रशासकिय समस्या -

२) शैक्षणिक समस्या -

- **उद्दिष्टे -**

१. उच्च श्रेणी मुख्याध्यापकांच्या प्रशासकिय कामकाजात येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
२. उच्च श्रेणी मुख्याध्यापकांच्या शैक्षणिक कामकाजात येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
३. मुख्याध्यापकांच्या लिंगभेदानुसार प्रशासकिय समस्यांची तुलना करणे.
४. मुख्याध्यापकांच्या लिंगभेदानुसार शैक्षणिक समस्यांची तुलना करणे.
५. मुख्याध्यापकांच्या अनुभवानुसार प्रशासकिय समस्यांची तुलना करणे.
६. मुख्याध्यापकांच्या अनुभवानुसार शैक्षणिक समस्यांची तुलना करणे.

- **परिकल्पना -**

१. मुख्याध्यापकांच्या लिगंभेदानुसार प्रशासकिय समस्यांमध्ये लक्षणीय फरक नाही.
२. मुख्याध्यापकांच्या लिंगभेदानुसार शैक्षणिक समस्यांमध्ये लक्षणीय फरक नाही.
३. मुख्याध्यापकांच्या अनुभवानुसार प्रशासकिय समस्यांमध्ये लक्षणीय फरक नाही.
४. मुख्याध्यापकांच्या अनुभवानुसार शैक्षणिक समस्यांमध्ये लक्षणीय फरक नाही.

EIIRJ Bi-monthly Journal

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा -**

प्रस्तुत संशोधन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील जि. प. पूर्ण प्राथमिक शाळांमध्ये करण्यात आले आहे. या शाळांमधील उच्च श्रेणी मुख्याध्यापकांच्या फक्त प्रशासकिय व शैक्षणिक कामकाजात येणाऱ्या अडचणींचा शोध होण्यासाठी करण्यात आलेले आहे. मुख्याध्यापकांच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक इतर समस्यासंदर्भात संशोधन करण्यात येणार नाही.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्व्हेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. शालेय सर्वेक्षणाच्या सहाय्याने कणकवलीतील जिल्हा परिषदेच्या पूर्ण प्राथमिक शाळांतील मुख्याध्यापकांना येणाऱ्या प्रशासकिय व शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**नमुना -**

प्रस्तुत संशोधनात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील २२५ प्राथ. शाळा आहेत. मात्र संशोधनासाठी संभाव्यतेवर आधारित नमूना निवड पद्धतीतून ६१ पूर्ण प्राथ. शाळांची निवड करण्यात आली. ६१ शाळांची निवड करण्यासाठी स्तरीय नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात आला. पूर्ण प्राथमिक शाळांतील ६१ उच्च श्रेणी मुख्यध्यापकांची निवड नमुन्यात करण्यात आली. लिगंभेदानुसार व अनुभवानुसार नमुना विभाजन पुढील सारणीत दिले आहे.

EIIRJ Bi -monthly Journal

**सारणी १.१**

**लिंगभेदानुसार नमुना संख्या**

| पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|
| ३१ | ३० | ६१ |

**सारणी.१.२**

**अध्यापन अनुभवानुसार नमुना संख्या**

| ५ वर्षापेक्षा कमी अनुभव | ५ पेक्षा जास्त अनुभव | एकूण |
|---|---|---|
| ४७ | १४ | ६१ |

वरील नमुन्याकडून माहितीचे संकलन करण्यात आले आहे.

- **संशोधन साधन -**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे. मुख्याध्यापकांना येणाऱ्या प्रशासकिय अडचणीचा शोध घेण्यासाठी प्रशासकिय कामकाजावर आधारित प्रश्न विचारुन प्रश्नावली संशोधन साधन तयार केले. तसेच मुख्याध्यापकांना येणाऱ्या शैक्षणिक अडचणीचा शोध घेण्यासाठी शैक्षणिक कामकाजावर आधारित प्रश्न विचारुन प्रश्नावली साधन तयार केले. सदर संशोधन साधन शिक्षणतज्ञाकडून तपासून प्रमाणित करण्यात आले.

- **माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन-**

प्रस्तुत संशोधनात माहितीचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक व अनुमानात्मक सांख्यिकी पद्धतीचा वापर करण्यात आला. मध्यमान प्रमाण विचलन या वर्णनात्मक संख्याशास्त्रीय तंत्राचा व (t) परीक्षिका या अनुमानात्मक सांख्यिकी तंत्राचा वापर केला.

त्यांचे विश्लेषण पुढील प्रमाणे.

EIIRJ
Bi -monthly Journal

**सारणी.३ १.३**

**मुख्याध्यापकांच्या लिगंभेदानुसार प्रशासकिय समस्यांचा मध्यमान फरकाची सार्थकता**

| लिंग | नमुना | मध्यमान | प्रमाण विचलन | टी परिक्षिका गुणोत्तर | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|
| पुरूष | ३१ | ३५.२० | २.७० | ०.०४ | लक्षणीय नाही. |
| स्त्रिया | ३० | ३५.५० | ३.२० | | |

डी कोष्टकातील टी ची किंमत ०.०५ स्तरावर २.०० आहे. प्राप्त झालेल्या टी ची किमंत ०.०४ आहे. कोष्टकातील टी च्या किंमतीपेक्षा ही किंमत कमी असल्यामुळे लक्षणीय फरक नाही.

**सारणी ३.१.४**

**मुख्याध्यापकांच्या लिंगभेदानुसार शैक्षणिक समस्यांच्या मध्यमान फरकाची सार्थकता**

| लिंग | नमुना | मध्यमान | प्रमाण विचलन | टी परिक्षिका गुणोत्तर | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|
| पुरूष | ३१ | २०.०५ | २.७५ | ५.८० | लक्षणीय आहे |
| स्त्रिया | ३० | १७.०५ | १.१५ | | |

डी कोष्टकातील t ची किंमत ०.०५ स्तरावर २.०० आहे. प्राप्त झालेल्या टी ची किंमत ५.८० आहे. कोष्टकातील t च्या किंमतीपेक्षा ही किंमत कमी असल्यामुळे लक्षणीय फरक आहे.

EIIRJ Bi -monthly Journal

**सारणी.३ १.५**

**मुख्याध्यापकाच्या अध्यापन अनुभवानुसार**

**प्रशासकिय समस्यांचा फरकाची सार्थकता**

| अध्यापन अनुभव | नमुना | मध्यमान | प्रमाण विचलन | टी परीक्षिका गुणोत्तर | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|
| ५ पेक्षा कमी | ४७ | ३५.४ | ३.२५ | ०.४९ | लक्षणीय नाही |
| ५ पेक्षा जास्त | १४ | ३५.९ | ३.४ | | |

डी कोष्टकातील टी ची किंमत ६.०५ स्तरावर २.०० आहे. प्राप्त झालेल्या टी ची किंमत ०.४९ आहे. डी कोष्टकातील टी च्या किंमतीपेक्षा ही किंमत कमी असल्यामुळे लक्षणीय फरक नाही.

**सारणी ३.१.६**

**मुख्याध्यापकाच्या अध्यापन अनुभवानुसार शैक्षणिक समस्यांच्या मध्यमान फरकाची सार्थकता**

| अध्यापन अनुभव | नमुना | मध्यमान | प्रमाण विचलन | टी परीक्षिका गुणोत्तर | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|
| ५ पेक्षा कमी | ४७ | १६.३७ | ३.८ | ३.०६ | लक्षणीय आहे |
| ५ पेक्षा जास्त | १४ | १९.०१ | २.५ | | |

डी कोष्टकातील टी किंमत ०.०५ स्तरावर २.०० आहे. प्राप्त झालेल्या टी ची किंमत ३.०६ आहे. डी कोष्टकातील टी च्या किंमतीपेक्षा ही किंमत जास्त असल्यामुळे लक्षणीय फरक आहे.

- **निष्कर्ष -**

१) पुरुष मुख्याध्यापक व स्त्रिया मुख्याध्यापक यांना येणाऱ्या प्रशासकिय समस्या सारख्या आहेत.

२) पुरुष मुख्याध्यापकांच्या तुलनेत स्त्रिया मुख्याध्यापकांना शैक्षणिक समस्या जास्त प्रमाणात येतात.

३) ५ वर्षापेक्षा जास्त अध्यापन अनुभव व कमी अध्यापन अनुभव असणाऱ्या मुख्याध्यापकांना प्रशासकिय समस्या सारख्या प्रमाणात आहेत.

४) ५ वर्षापेक्षा कमी अध्यापन अनुभव असणाऱ्या मुख्याध्यापकांना ५ वर्षापेक्षा जास्त अध्यापन अनुभव असणाऱ्या मुख्याध्यापकांच्या तुलनेत जास्त समस्या आहेत.

- **शिफारशी -**

१) पुरुष व स्त्री मुख्याध्यापक यांच्या प्रशासकिय अडचणी सारख्या असल्या तरी त्यांना मदतीसाठी लिपिकाची नियुक्ती करण्यात यावी. त्यामुळे त्यांच्या प्रशासकिय कार्यात गती येईल. तसेच शैक्षणिक कामकाज करण्यास पुरेसा वेळ मिळेल.

२) पटसंख्येनुसार मोठ्या पटसंख्येच्या प्रत्येक शाळेत गरजेनुसार एक उपमुख्याध्यापक, लिपिक, शिपाई यांची नियुक्ती करण्यात यावी.

३) सर्व मुख्याध्यापकांना संगणक, इंटरनेट हाताळण्याचे प्रशिक्षण द्यावे. त्यामुळे त्याच्या प्रशासकिय व शैक्षणिक कामकाजात मदत होईल. तसेच सर्व शाळा इंटरनेट व टेली कॉन्फरन्सने जोडल्या जातात.

४) सर्व शिक्षा अभियांनाअंतर्गत शाळा बांधकाम, इमारत दुरूस्त्या, शालेय पोषण आहार वितरण इ. कामे स्वतंत्र यंत्रणेस देण्यात यावीत.

५) मुख्याध्यापकांच्या कामकाजाचे वस्तुनिष्ठ मुल्यमापन वर्षातून किमान दोन वेळा व्हावे. म्हणजे ते आपल्या कर्तव्यात गतिमान राहतील.

**संदर्भ -**

१) दास जे. आर आणि गर्ग वी. डी. (१९८५) प्राथमिक शिक्षणाची गळती व शैक्षणिक गुणवत्तेवर प्रभाव दिल्ली : महानगर पालिका

२) मुळे रा. श. व प्रा. उमाठे वि. तु. (२०००). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे औरंगाबाद विद्या प्रकाशन

3) Best John khan jemes (1986) Research in Education Delhi :- Prentice - all of India private Ltd.

४) उपासनी ना. के. आणि कुलकर्णी के. बि. (१९९६) नवे शैक्षणिक मुल्यमापन आणि संख्याशास्त्र पुणे : श्री विद्या प्रकाशन

EIIRJ Bi -monthly Journal